कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित
रुग्णालयातील अध्यापकीय पदे .

**महाराष्ट्र शासन**
वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक : आयुसे-१०२१/प्र.क्र.१३०( भाग-१)/आयु-१
गोकुळसदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन गो.ते.संकुल,
९ वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ०४ नोव्हेंबर, २०२२.

वाचा:-

१) शासन निर्णय वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक - आयुसे/२००८/ प्र.क्र.२१०/आयु-१, दिनांक ३०.०८.२००८,

२) शासन निर्णय वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक - एमईएस-१५०८/प्र.क्र.९४/०८/वैसेवा - १, दिनांक ०७.०९.२०११,

३) वित्त विभाग शासन प रिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२२/कोषा प्रशा ४, दिनांक २९.०१.२०२०,

४) आयुष संचालनालयाचे पत्र क्र.आसंमु/आस्था /आयु. अध्यापक/करार नियुक्ती/मानधनवाढ/ २०२२ /आयु-३/११०९१, दिनांक ०६/१०/२०२२

प्रस्तावना :-

शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांची पदे कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करतेवेळी त्यांचे सद्यस्थितीतील मानधन अत्यंत अल्प असल्यामुळे सदर पदे कंत्राटी पध्दतीने भरली जात नाहीत. त्याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या हितावर व रुग्णसेवेवर होत असतो. त्याशिवाय नियमित नियुक्त्यांसाठी काही कारणास्तव होणारा विलंब देखील समस्येत भर टाकतो. शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय तसेच शासकीय होमिओपॅथीक महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील अध्यापकांची पदे नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

संदर्भ क्र.१ येथील दिनांक ३०.०८.२००८ येथील शासन निर्णयानुसार सहाय्यक प्राध्यापकांची पदे तात्पुरत्या नियुक्तीने भरण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या पदांसाठी सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१००/- व ग्रेड पे रुपये ६०००/- ही वेतनश्रेणी निश्चित करण्यात आली आहे. तथापि, वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२२/कोषा प्रशा ४, दिनांक २९.०१.२०२० अन्वये वित्त विभागाने असे स्पष्ट केले आहे की, शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची नियमित वेतन देयके अदा

AYURVEDA RESEARCH & CAREER ACADEMY(ARCA)
www.ayurvedacareer.com

Conatct : 9372045685

करण्यासाठी सेवार्थ प्रणालीचे विकसन करण्यात आले असून त्याद्वारे केवळ नियमित राज्य शासकीय कर्मचा-यांची वेतन देयके सरकरीत करणे अभिप्रेत आहे. त्यामुळे तात्पुरत्या / कंत्राटी / हंगामी कर्मचा-यांचे पारिश्रमीक/मानधन हे सेवार्थ प्रणालीतून ०१-वेतन या उद्दिष्ट शीर्षातून तयार न करता १०-कंत्राटी सेवा या उद्दिष्ट शीर्षातून बिल पोर्टल प्रणालीवरुन तयार करणे आवश्यक राहील. त्यानुसार त्यांना नियमित वेतनश्रेणीऐवजी दरमहा एकत्रित ठोक मानधन अदा करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयातील तरतुदीमध्ये काळानुरुप योग्य ते बदल करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :-

संदर्भ क्र. १ येथील दिनांक ३०.०८.२००८ चा शासन निर्णय याव्दारे अधिक्रमित करण्यांत येत असून आयुष संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांतील अध्यापकांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी खालीलप्रमाणे मानधन निश्चित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रस्तावित प्रतिमाह मानधन |
|---|---|---|
| १ | प्राध्यापक | रु.१,००,०००/- |
| २ | सहयोगी प्राध्यापक | रु.८०,०००/- |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | रु.७०,०००/- |

०२ निवडीची कार्यपध्दती :-

कंत्राटी पध्दतीने करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांकरीता संबंधीत आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता हे सक्षम असतील. संबंधीत अधिष्ठाता खालील अटींच्या अधीन राहून कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या करण्याची कार्यवाही करतील.

(१) भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद/ भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांच्या मानकांमध्ये नमूद केलेली अर्हता विचारात घेऊन आवश्यक तेवढीच पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता पदांची अचूक गणना करण्यात यावी.

(२) राज्यातील ५ शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांना आकृतिबंधानुसार मंजूर असलेल्या पदांपैकी केवळ रिक्त असलेल्या पदांवरच कंत्राटी पध्दतीने पदे भरण्यात यावीत.

(३) कंत्राटी तत्त्वावर पदे भरताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(४) कंत्राटी पध्दतीने करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांना व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्यात येऊन पारदर्शकतेचा अवलंब करण्यात यावा, तसेच अशा नियुक्त्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन गुणवत्तेनुसार केल्या जातील. मुलाखतीबाबतचे अभिलेख जतन करुन ठेवण्यास अधिष्ठाता जबाबदार असतील. नियुक्तीसाठी बाहय शक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.

(५) कंत्राटी पध्दतीने करण्यात येणाऱ्या नियुक्त्या या संबंधित महाविद्यालयात रिक्त असलेल्या पदांच्या संख्येच्या मर्यादित असतील,

(६) कंत्राटी पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिन्यांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.

(७) कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

(८) वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील,

(९) कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

(१०) उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल

(११) कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तिक रजा अनुज्ञेय असतील.

(१२) कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त्या हया मंजूर आकृतीबंधातील रिक्त असणाऱ्या पदावरच करण्यात याव्यात.

(१३) कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

(१४) कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

(१५) उमेदवाराच्या कामकाजाचे मुल्यांकन होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित विभाग प्रमुखांनी/अधिष्ठाता यांनी दर तीन महिन्यांनी उमेदवाराच्या कामकाजाचा तपशीलवार आढावा स्वतःच्या अभिप्रायासह अधिष्ठाता यांना सादर करावा.

(१६) संबंधित विषयाच्या पदव्युत्तर अथवा पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून उमेदवाराच्या शैक्षणिक कामकाजासंदर्भात मुल्यांकन करण्याच्यादृष्टीने अभिमत (Feedback) घेण्यासाठी अध्यापन कौशल्य, वक्तशीरपणा, सचोटी इत्यादी निकषाच्या आधारे निश्चित करण्यात आलेल्या दहा गुणांच्या प्रश्नावलीवर गुणांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

(१७) रुग्णसेवेसंदर्भात अभिमत (Feedback) घेण्यासाठी काही प्रसंगी रुग्णांकडून स्वतंत्र प्रश्नावलीच्या आधारे गुणांकन प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

(१८) शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाच्या अधिष्ठाता यांना निकड असल्यास पुन्हा जाहीरात देऊन कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याची नव्याने कार्यवाही करावी.

(१९) बिगर सेवानिवृत्त गटातून कंत्राटी पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

०३. यावाबत होणारा खर्च संबंधित लेखाशिर्षाखालील १० कंत्राटी सेवा या उद्दिष्टासाठी मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

०४. सदर आदेश हे निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहतील.

०५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४४६/२०२२/व्यय-१३, दि.०२/११/२०२२ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुरेन्द्र चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. म.मंत्री, वैद्यकिय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ,

५. मा.विरोधी पक्षनेता विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा.विधानमंडळ सदस्य,.
७. उपसचिव, मा.मुख्यसचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व आयुष), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
१०. सर्व अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद / महाविद्यालये व रुग्णालये,
११. महालेखापाल (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर.
१२. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. निवडनस्ती / संग्रहार्थ (आयु-१).

AYURVEDA RESEARCH & CAREER ACADEMY(ARCA)
www.ayurvedacareer.com

Conatct : 9372045685